# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,

हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट www.kallappannaawadejawaharsssk.com

## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत
**"बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय"**
या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष —**
**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**
**मा. श्री. सुरेश माने-पाटील**
(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**
**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा. श्री. दादासो सांगावे**
संचालक

**मा. श्री. संजयकुमार कोथळी**
संचालक

**मा. श्री. सुकुमार किणींगे**
संचालक

**मा. सौ. वंदना कुंभोजे**
संचालिका

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**अजित चौगुले**
सि. ॲग्री ओव्हरसियर,
(कुरुंदवाड विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : सोमवार दि. २४/०४/२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजता.

**स्थळ** : भाऊसो चौगुले (शामान) विकास सेवा सोसायटी, **अब्दुललाट.**


कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी
सहकारी साखर कारखाना लि.


कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी
सहकारी साखर कारखाना लि.
परिसंवाद


कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी
सहकारी साखर कारखाना लि.
ऊस पिक परिसंवाद



# अब्दुललाट येथे जवाहर कारखान्यातर्फे ऊस पीक परिसंवाद



**अब्दुललाट/महान कार्य वृत्तसेवा**

कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हुपरी यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊसो चौगुले विकास सेवा सोसायटी अब्दुललाट येथे 'ऊस पीक परिसंवाद' आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी के. एन. कमिटीचे चेअरमन डॉ. राहुल आवाडे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक निवृत्त शास्त्रज्ञ, वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणेचे सुरेश माने-पाटील उपस्थित होते. तसेच व्हा. चेअरमन बाबासो चौगुले, सरपंच कस्तुरी कुरुंदवाडे, जवाहर कारखान्याचे संचालक दादासो सांगावे, शेती अधिकारी किरण कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सुरेश माने पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. यावेळी संचालक संजय कुमार कोथळी, सुकुमार किणींगे, जे. जे. पाटील, वंदना कुंभोजे, ग्री ओव्हरसीयर अभय पाटील, अजित चौगुले, उपमुख्य शेती अधिकारी भास्कर पट्टणकुडे, रावसाहेब मड्डेपाटील, माझी उपसरपंच संतोष कोथळी, अभिजीत मड्डेपाटील, ग्री असिस्टंट दीपक कांबळे व राजू सूर्यवशी आदी मान्यवरांसह कारखान्याचे सर्कल स्टाफ व सभासद शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जवाहर साखर कारखान्यातर्फे अ.लाट येथे ऊस पिक परिसंवाद संपन्न

**अब्दुललाट/प्रतिनिधी**

शिरोळ तालुक्यातील अब्दुललाट येथे कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्यावतीने सोमवार दि. २४ रोजी येथील भाऊ चौगुले सोसायटी येथे ऊस विकास योजनेअंतर्गत 'बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय' या विषयावर ऊस पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केन कमिटी चेअरमन डॉ. राहुल आवाडे होते. प्रमुख मार्गदर्शक निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांनी ऊस पिकासाठी यथोचित मार्गदर्शम केले. स्वागत शेती अधिकारी किरण कांबळे यांनी केले.

प्रमुख मार्गदर्शक सुरेश माने-पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले, सध्या शेती करताना नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून बदलत्या हवामानाचा अंदाज घेऊनच शेती करणे ही काळाची गरज बनली आहे. आपले उत्पन्न क्षेत्र वाढवण्यासाठी पारंपरिक ऐवजी आधुनिक शेतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. कारखान्याच्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ऊस पीक परिसंवाद सारखे कार्यक्रम घेऊन शेतीसाठी सध्या काय उपयुक्त आहे, शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी काय करणे गरजेचे आहे, याची माहिती ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या प्रमुख पीक म्हणून उसाकडे पाहिले जाते. आज आपण पाहत आहोत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये अनेक साखर कारखाने सध्या कार्यरत आहेत. परंतु वातावरणाच्या बदलामुळे ऊस पिकावर देखील परिणाम होत आहे. परिणामी जितके अपेक्षित उत्पन्न व्हावे अशी इच्छा असते तसे होताना दिसत नाही. असे का होते याची कारणे शोधणे आता गरजेचे आहे. वैचारिक शेती आधुनिकतेचा वापर, ऊस वाढीसाठी लागणारी कंपोस्ट खते, शेणखत, पाचटचे नीट नियोजन, पाणी याकडे शेतकऱ्याने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमास या कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब चौगुले, सरपंच सौ. कस्तुरी कुरुंदवाडे, संचालक संजय कोथळी, दादासो सांगावे, माजी संचालक जे.जे. पाटील, शेती अधिकारी किरण कांबळे, उपशेती अधिकारी भास्कर पट्टणकोडे, अजित चौगुले, अभय पाटील, रावसाहेब पाटील-मंडे, माजी उपसरपंच संतोष कोळी, ग्रामपंचायत सदस्य अभिजीत पाटील यांच्यासह कारखान्याचे सर्कल स्टाफ, लाट, लाटवाडी, दत्तवाड, घोसरवाड गावचे शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार दादासो सांगावे यांनी मानले.